INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 7 | AUGUST - 2023

# धर्मनिरपेक्ष आणि विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण : काळाची गरज

प्रा.डॉ. सुकेशिनी अंकुश जानराव
कॉलेज ऑफ एज्युकेशन, घारगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर

## प्रस्तावना -




धर्मनिरपेक्षता सामाजिक जीवनाचा प्रमुख आधारस्तंभ आहे. धर्मनिरपेक्षता म्हणजे धर्माचा अभाव नसून सर्व वेगवेगळ्या धर्माचे स्थान समान मानणे. भारतात विविध धर्म आहेत परंतु राज्यघटनेने कोणत्याही धर्माला कमी लेखलेले नाही.

धर्मनिरपेक्षता विविध प्रकारे स्पष्ट केली गेली आहे. पोडाच्या मार्सिग्लिओने सर्वप्रथम धर्मनिरपेक्ष राज्याची कल्पना सर्वांपुढे मांडली. 'डिफेन्सर पॅसिफिक' या त्याच्या सुप्रसिद्ध पुस्तकात तो म्हणतो, नागरिकांचे धर्माबद्दलचे हक्क पूर्णपणे स्वतंत्र आहेत. आणि कोणत्याही व्यक्तीला केवळ त्याच्या धर्माखातर शिक्षा देणे अयोग्य आहे. हे विचार म्हणजे केवळ कल्पनांचे स्पष्टीकरण असून ते बिकसित होण्यासाठी शतकानुशतके जाबी लागली. मध्ययुगीन अंधकारमय कालखंड आणि आधुनिक जग यांच्यामध्ये सूपच फरक आहे. 'ईश्वर आणि मानवता हे केवळ एखाद्या धर्माचेच क्षेत्र किंवा अधिकार नाही' या संकल्पनेवर आधुनिक जग आधारलेले आहे

## भारतीय घटनेने संमत केलेली धर्मनिरपेक्षतेची संकल्पना -

व्यक्ती आणि धर्म यांच्यामधले परस्परसंबंध विविध धर्ममधले आपापसांतले संबंध, धर्म व राज्य यांच्यामधले संबंध, राज्य आणि व्यक्ती यांच्यामध्ये असलेल्या संबंधामध्ये असलेल्या परस्पर सामंजस्यावर आधारलेली अशी ही व्यापक संकल्पना आहे. प्रत्येक व्यक्तीला आपले धार्मिक विधी करण्याचा आणि आपल्या धर्माचा प्रसार करण्याचा वैचारिक स्वातंत्र्याचा हक्क राज्यघटनेच्या तिसऱ्या भागातल्या मूलभूत हक्कांसंबंधीच्या 25व्या कलमात देण्यात आला आहे.

सापेक्ष म्हणजे अवलंबून असणे, निरपेक्ष म्हणजे अवलंबून नसणे. विद्यार्थी परीक्षेत नापास झाले तर त्याचे कारण दुष्काळ हे होऊ शकत नाही. दुष्काळ पडण्याचा आणि विद्यार्थ्यांनी परीक्षेत नापास होण्याचा प्रत्यक्ष संबंध नसतो. म्हणजेच परीक्षेत नापास होणे ही बाब दुष्काळ - निरपेक्ष आहे. परीक्षेत नापास होणे ही बाब धर्मनिरपेक्ष आहे कारण धर्मानुसार वर्तन केले व न केले तरी परीक्षेत पास होणे त्यावर अवलंबून नसते. पुष्कळ विद्यार्थी परीक्षेत पास व्हावे म्हणून देवाची पूजा करतात; नमस्कार करून परीक्षेला जातात परंतु अभ्यास व्यवस्थित व पुरेसा झाला नसेल आणि

उत्तरे अपेक्षेप्रमाणे लिहिली गेली नसतील तर पास होण्यासाठी लागणारे गुण पुरेसे मिळणार नाहीत. म्हणजेच परीक्षेत पास होणे हे अभ्याससापेक्ष आहे धर्मसापेक्ष नाही, धर्मनिरपेक्ष आहे.

धर्मनेत्पेक्षता म्हणजे धर्मविरोध नव्हे. ज्या क्षेत्राचे स्वतः चे नियम व कार्यपद्धती आहेत त्यात धर्मानि लुडबूड करू नये असा धर्मनिरपेक्षतेचा अर्थ होय. ज्याची आपल्या धर्मावर मनोमन श्रद्धा आहे त्याला ती श्रद्धा ठेवण्याचा, त्या रीतीने उपासना करण्याचा पूर्ण हक्क आहे. प्रार्थना केल्यामुळे मन शांत राहाते, मनोबळ बाढते असे ज्या व्यक्तीला वाटते त्याने देवाची प्रार्थना करायला हरकत नाही. ज्यांना भजन-कीर्तन करावयास आवडते, नमाज पढायला जावेसे वाटते त्यांनी जरूर जाने परंतु त्या जाण्याने दुसऱ्याच्या कामाचा खोळंबा होऊ नये याची खबरदारी घेतली पाहिजे. तसेच दुसऱ्यांनीही भजन करावे वा नमाज पढावा असा आग्रह धरू नये, इतरांना त्रास होईल अशा रीतीने धर्माची उपासना करू नये. कोणीही विज्ञाननिष्ठ माणूस अशा व्यक्तींच्या उपासनेला विरोध करणार नाही. मात्र, मूल होण्यासाठी हजारो मुक्या प्राण्यांचा व काही ठिकाणी मनुष्याचा/लहान कोवळ्या बालकांचा बळी देणे मात्र सहन होणार नाही व अशा घटना धर्माच्या नावावर करून मुक्या प्राण्यांचा वा मनुष्यप्राण्यांचा जगण्याचा हक हिरावून घेऊ शकणार नाही. धर्माचरणाच्या नावाखाली राक्षसी स्वार्थसाधूपणा खपवून घेतला जाणार नाही. लग्न, घर कोठे बांधावे, कुटुंबनियोजन करावे की नाही याबाबतचे निर्णय आणि वर्तन हे पूर्णतया विज्ञाननिष्ठ आणि धर्मनिरपेक्ष असू शकते. त्यासाठी धर्माचा आधार घेणे अनावश्यक आहे.

धर्म ही एक वैयक्तिक सदसद्विवेक बुद्धीची भावना आणि इतर सर्व धर्माबाबतची भूमिका असते. माणसाच्या अंतर्मनातील एक पवित्र भावना आहे, जी तो दुसऱ्यांकरता काय करतो यामध्ये प्रतिबिंबित झाली पाहिजे. जे प्रेम किंवा महत्त्व स्वतःला मिळावे याकरता प्रार्थना केली जाते तेच दुसऱ्या बांधवाला देण्याचा हा मुद्दा आहे. धर्म ही कोणाची वैयक्तिक मालमत्ता नसून तो केवळ आपला स्वार्थ साधून घेण्याचे साधन नव्हे.

प्रत्येक धर्माचे पुढारी हे प्रेम, दया अशा गुणांचे अवतार आहेत. त्यांचे वैयक्तिक आयुष्य दयाळूपणाच्या घटनांनी भरलेले असून त्यांच्या अनुयायांनी त्या दुसऱ्या धर्माचा आदर केला पाहिजे असा आदेश दिलेला आहे.

एखाद्या माणसाने, निष्पाप माणसांविरुद्ध स्त्रिया आणि बालकांविरुद्ध हात उचलणे म्हणजे अशा थोर व्यक्तींच्या लौकिकाचा अपमान आहे. खून, बलात्कार, लूट आणि जाळपोळ यांना कोणत्याही धर्मामध्ये स्थान असूच शकत नाही.

सुबुद्ध माणूस, त्याचा धर्म आणि अशा पाशवी प्रवृत्ती यांच्यामधील सांगड मान्य करेल या गोष्टीवर विश्वास बसणे अशक्य आहे. त्यामुळे एक गोष्ट जाहीर आहे की अशा घटना एकतर मानसिक असंतुलनाचा परिणाम आहेत किंवा मुद्दाम केलेला खोडसाळपणा आहे. जेव्हा खोडसाळपणामुळे आर्थिक जीवन बिघडून टाकले जाते, त्यावेळी पगारदारांना धंदा आणि व्यवसाय करणाऱ्यांना आपल्या उपजीविकेमधून जबर किंमत मोजावी लागते. अर्थातच गरीब सर्वांत जास्त भरडले जातात. जेव्हा काही दिशाभूल झालेल्या असामाजिक तत्वांमध्ये संघर्ष होतो, तेव्हा हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख हे धर्म किंवा आणखी कोणत्याही धर्माबद्दलचा आदर वाढतो का ?

भारतीय नीतीमध्ये धर्मनिरपेक्षता ही अशी गोष्ट आहे की प्रत्येक नागरिकाने दररोज आपल्या कृतीने तिचे संवर्धन केले पाहिजे. आपल्या देशाच्या राज्यव्यवस्थेमध्ये ह्या विशेष लक्षणाला फार महत्त्व आहे, जे केवळ आपल्या देशापुरतेच मर्यादित नाही तर जगातल्या सगळ्या जनतेसाठी आणि देशांसाठी मानवजातीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी दिशा दाखवणारा एक संदेश आहे.

**विज्ञाननिष्ठ दृष्टिकोण -**

1976 साली घटनेच्या भाग 4 अ मध्ये मूलभूत कर्तव्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. सांस्कृतिक विविधता हा देशाचा स्थायीभाव आहे हे मान्य केले पाहिजे. त्यामुळे सर्वात अधिक महत्त्वाचे कर्तव्य हेच ठरते की सर्व भारतीयांमध्ये आपापसांत समान बंधुभाव आणि ऐक्याची भावना वाढीस लावणे, स्त्रियांना समान स्थान देणे, सांस्कृतिक विविधता असणाऱ्या उच्च परंपरांचे महत्त्व ओळखून त्यांची जपणूक करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. त्याचबरोबर शास्त्रीय दृष्टिकोण विकसित करणे आणि मानवतावादी दृष्टिकोण विकसित करणे यावरही भर दिलेला आहे.

शास्त्रीय दृष्टिकोण सत्य अनुभवांवर आधारीत असतो. केवळ काल्पनिक किंवा व्यक्तिनिष्ठ मतांवर सत्य आधारता येत नाही. सत्य म्हणजे एखादी घटना प्रत्यक्ष घडताना वा घडलेली पाहाण्याचा अनुभव तेथे हजार असलेल्या सर्वांना घेता आलेला असतो. मनुष्यप्राण्याला पाच इंद्रिये असतात - नाक, कान जीभ, त्वचा आणि डोळे यांच्या सहाय्याने घटनेचा अनुभव घेता येता येतो. चुकून वा अपघाताने एखादा अवयव अधू असेल वा निकामी असेल तरी अन्य अवयवांच्या आधारे अनुभव घेता येतो. वास, चव, ऐकणे, पाहणे आणि स्पर्श होणे - या पाच क्रियांद्वारे समोर काय घडले, कोण त्यामध्ये अंतर्भूत आहे, 'स्व'चा म्हणजे अनुभव घेणाऱ्याचा आणि अन्य घटकांचा काय संबंध आहे इत्यादींचे ज्ञान होते आणि सत्याचे आकलन होते. अंधारून येते, काळे ढग जमा होतात, गडगडाट होतो, विजा चमकतात आणि मुसळधार पाऊस पडतो - हे सर्व अनुभव 'स्व' पासून दूर घडतात परंतु 'स्व' ला त्याचा प्रत्यय येतो तो पाच इंद्रियांमार्फत. अशा घटना लहानपणापासून पाहिलेल्या असतात. प्रथम पाहतो तेव्हा 'स्व'ला भीती वाटते, गंमत वाटते, आश्चर्य वाटते, आनंद होतो वा होत नाही. आणि बारंबार अशा घटना तो दरवर्षी पाहू लागतो वा अनुभवू लागतो त्यावेळी त्याला पहिल्यावेळच्या भावना शिल्लक राहातातच असे नाही. भय दूर होते कारण असे घडणारच आहे. हे माहीत असते. सत्य म्हणजे ज्ञान, ज्ञान म्हणजे सत्य - दिसणारे आणि न दिसणारेही. माणसाच्या मनातील भीती, राग, द्वेष, करुणा हे. भाव असणे हे सत्य आहे. ते भाव दिसत नसले तरी ते कृतीच्या मागील प्रेरक असतात. निरनिराळ्या सांस्कृतिक समूहांमध्ये प्रचलित असणाऱ्या परंपरा आणि प्रेरणा, राग- प्रेम, आनंद-दुःख व्यक्त करण्याच्या पद्धती याही सत्य असतात. बरबर दिसणाऱ्या कृत्रिम व्यवहारांमागे त्या दडलेल्या असतात आणि काही प्रसंगांच्या वेळी ते सांस्कृतिक वैशिष्ट्याच्या रूपात ते सामूहिक जीवनात दिसून येतात.

ज्ञान म्हणजे मनुष्याच्या जीवनाशी संबंधित माहिती नैसर्गिक घटना, मनुष्याचे खाणे-पिणे, लग्नसंबंध, कला, राजनीती, समूहरचना इत्यादींबाबतचे व्यवहार - सर्वांचा अंतर्भाव होतो. केवळ माहिती म्हणजे विज्ञान नव्हे. माहितीच्या आधारे दोन वा दोनांपेक्षा अधिक घटनांचा कार्यकारण संबंध प्रस्थापित करून चिरंतन टिकेल असे अनुमान काढणे व त्या अनुमानांच्या सहाय्याने सतत अनुभवनिष्ठ बर्तन करणे विज्ञानामुळे शक्य होते. विज्ञान म्हणजे ज्ञानाची पद्धतशीरपणे मांडणी करून सांगितलेली तत्त्वे आणि अशा अनेक तत्त्वांचा संच. पद्धतशीरपणे सिद्ध केलेली तत्त्वे म्हणजे सिद्धांत. सिद्धांत मनुष्यांना सतत मार्गदर्शक ठरतात, आणि भविष्याबद्दल अंदाज बांधणेही शक्य असते. विज्ञानामुळे माहितीवर विश्वास ठेवणे सोपे जाते. मनातील भीती, संशय किंवा गैरसमज दूर होतात. कोणती पिके घ्यावीत, बाजारात माल केव्हा न्यावा, कपडे कोणते घालावेत येथापासून ते दहा वर्षांनंतर कोणत्या समस्या उद्भवतील येथपर्यंत अंदाज बांधता येतात. विज्ञान माणसाचा गुरू आहे, देवासारखा आहे आणि त्यामुळे विज्ञानावर निष्ठा ठेवली पाहिजे. न दिसणाऱ्या देवापेक्षा अनुभवनिष्ठ विज्ञान अधिक श्रेष्ठ आहे असे मानण्यास बाब आहे. विज्ञान म्हणजे माणूस हा हजारो वर्षांच्या उत्क्रांतीतून झाला. प्रयोग, निष्कर्ष, मांडणी आणि सिद्धांत या चार प्रक्रियांमधून गेल्यावर सत्य जगासमोर मांडण्यात येते. विज्ञान खोटे-खरे नेमके कोणते हे ठरविण्यास मदत करते. विज्ञान खोटे-खरे नेमके कोणते हे ठरविण्यास मदत करते. विज्ञान

चिकित्सा करावयास शिकविते त्यामुळे आजची शिक्षणपद्धती, उत्पादन पद्धती, संचार आणि दळणवळण, व्यापार आणि भांडवल गुंतवणूकइत्यादी सर्वांची उभारणी विज्ञानावर झाली पाहिजे.

वैज्ञानिक प्रगतीमुळे आज मानवाला जन्मापूर्वीपासून आरोग्याची काळजी, मातेच्या गर्भात मुलाचा जीव वाढतो आहे की मुलीचा येथपासून अपत्ये होऊ नयेत म्हणून उपाय करण्यापर्यंत; मनुष्याचा एखादा अवयव मरण्यापूर्वी काढून वा जिवंतपणीही एखादा अवयव काढून दुसऱ्या माणसाच्या शरीरात आरोपण करणे व त्या अवयवाचा फायदा दुसऱ्या माणसाला करून देणे इत्यादी पूर्वी दैवाधीन वाटणाऱ्या बाबी आज माणसाने सहज शक्य करून दाखविल्या आहेत. विज्ञानाने माणसाचे आयुष्य कित्येक वर्षांनी वाढविले इतकेच नव्हे तर दळणवळणाच्या साधनांनी निसर्गातील सर्व अशक्यप्राय वाटणाऱ्या बाबी उपलब्ध करून दिल्या, जीवन सुरक्षित आणि बनविले सुखकर बनविले.

मानवाच्या बुद्धीची क्षमता इतर प्राण्यांच्या तुलनेत अतिप्रचंड आहे यात शंका नाही. या बुद्धीचा उपयोग आप भौतिक सोडविण्यासाठी केला तर कित्येकदा केवळ कुतूहल म्हणूनही त्यात अनेक प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्याचा प्रयत्न केला. व्यावहारिकदृष्ट्या नजीकच्या भविष्यकाळात निरुपयोगी असा वाटणारा शोधही कालांतराने फार महत्त्वाचा आणि व्यावहारिक उपयोगाचा ठरू शकतो हेही आता माणसाने अनुभवले आहे.

विश्वाच्या मागे कोणती रचना आहे आणि ती कोणी तयार केलेली आहे की केवळ अपघाताने आपोआप घडून आली आहे. तीही कोणी निर्मा केली असेल तर त्या ईश्वराला निर्माण करणात परमेश्वर कोण आणि हा प्रश्न परत परत कितीही विचारत गेलो व उत्तरांच्या कितीही शिड्या चढल्या तरी पुन्हा त्या पायरीवरील तो प्रश्न राहतोच; कुतूहल शिल्लकच राहाते. आजही विज्ञान याच प्रभाशी झगडत आहे. अजूनही मृत्यूनंतरमाणूस कोठे जातो व त्याचे रूप कोणते या प्रश्नाचे उत्तर सापडलेले नाही. अंतरीक्षाच्या अंताशी व त्यापलीकडे काय हेही समजलेले नाही. अणू हा जडद्रव्याच्या शेवटचा अविभाज्य घटक आहे असे बराच काळ वाटले परंतु त्यानंतर प्रोटॉन, न्यूट्रॉन, न्यूक्लियस या संकल्पना आल्या.

आज विविध प्रकारच्या दुर्बिणी मानवाने शोधून काढल्याने 1500 कोटी प्रकाशवर्षे दूर असलेल्या ताऱ्यांचा मागोवा आपण घेऊ शकतो असे सिद्ध केले आहे. परंतु त्याही पलिकडे जाऊन विश्वाचा शोध घेण्यासाठी मानवाची धडपड चालूच राहील.

विश्वाविषयीचे हे कुतूहल आणि त्याच्या विलक्षण रचनेविषयीचा हा आदरभाव (ईश्वराला मध्ये न आणताही विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासून जागृत केला पाहिजे. विज्ञाननिष्ठा म्हणजे विश्वाबद्दल वाटणारी स्तिमित भावना आणि त्याबाबत अधिक जाणून घेण्याची जिद्द यांचा संगम आहे. ईश्वराचे अस्तित्व सिद्ध करण्यापुरते विज्ञान प्रगत झाले नसले तरी 'ईश्वर अमुकच आहे' असे मानण्याचा माणसाचा हट्टही निरर्थक आहे. अशावेळी विज्ञाननिष्ठा आणि परमेश्वराचे न कळलेले निराकार स्वरूप ही दोन्ही मान्य केली पाहिजेत. परमेश्वराचे स्वरूप मात्र जोपर्यंत 'सत्य' होत नाही तोपर्यंत काल्पनिकच राहाणार हेही तितकेच खरे. हा काल्पनिक आधार मानवाला अनेक संकटांमध्ये उपयोगी पडतो. हा आधार मानसिक असतो आणि या मानसिक आधाराचे दोर बुद्धीच्या शस्त्राने नेहमीच तोडता येतात असे नाही. पुष्कळदा केवळ बुद्धीचाच आधार घेऊन जगायचे ठरविले तरी आकस्मिकपणे घडणाऱ्या घटना चोरी, अपघाती मृत्यू नातेवाईकांचे मृत्यू इत्यादी तीव्र दुःख देणाऱ्या अशा घडलेल्या असतील तर माणसाला चक्रावून टाकतात. देवाचे आभार मानायला वा त्याच्यावर रागवायला, दैवाला दोष द्यायला त्यांची विज्ञाननिष्ठा आड येते. परंतु तरीही 'असे कसे झाले' याबाबतचे आश्चर्य त्यांना सतावत राहाते. योगायोगाने घडणाऱ्या गोष्टींबद्दल वाटणारे आश्चर्य विज्ञानाच्या पद्धतशीरपणे घडणाऱ्या शिस्तबद्ध घटनांबद्दल वाटणाऱ्या आश्चर्यापेक्षा अधिक 'सत्य' वाटते.

विज्ञाननिष्ठेमुळे आधार वाटावा, भीती नाहीशी व्हावी परंतु अहंकार होऊ देऊ नये. अहंकारामुळे दुसऱ्याला समजून घेण्याची क्षमता राहात नाही. दुसऱ्याच्या श्रद्धास्थानावर किंवा भावनांवर आघात करण्यासही अहंकार प्रवृत्त

**करतो. माणसे दुखावली जातात, त्यांच्या अंधश्रद्धा दूर होण्याऐवजी त्या दुखावल्या गेल्यामुळे विरोधी तीव्र प्रतिक्रिया होतात. म्हणून विज्ञाननिष्ठा ही माणसाला समजावून घेण्यासाठी वापस आली पाहिजे. एरव्ही विज्ञान विनाशाला कारणीभूत होते.**